RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ५७

दि. २० जून २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## जास्त पैशांचा हव्यास नडला! ३१ हजार गुंतवणूकदारांची १५ कोटींपेक्षा अधिक फसवणूक; दोघांना अटक

**नागपूर/प्रतिनिधी** : २५ दिवसांमध्ये दुप्पट पैसे देऊ, असे कोणी आमिष दाखवित असेल तर त्यापासून सावध राहा, अशी रिंगटोन सध्या मोबाईलवर ऐकायला मिळते. गुंतवणूकदारांची फसवणूक होऊ नये, यासाठी या पद्धतीनं केंद्र सरकारकडून जनजागृती केली जात आहे. मात्र, असे असूनही अनेकजण जास्त परतावा मिळणार या भाबड्या समजुतीनं पैसे गमावून बसतात, असेच उदाहरण नागपूर शहरात समोर आलं आहे. सीरियलबीपी सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड कलेक्शन आणि फ्युचर डिजिटल असेट्स कंपनीच्या नावाखाली क्रिप्टोकॉईन आणि साखळी पद्धतीद्वारे देशभरातील हजारो गुंतवणूकदरांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप आंतरराज्य टोळीवर आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोन्ही मुख्य आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडील १ कोटी ७१ लाख रुपयांची रक्कम गोठविण्यात आली आहे.गुन्ह्यतील मुख्य आरोपी मिहुल शिवाजी दीक्षित यानं स्वत:कडे १६ पदव्या असल्याचा दावा केला होता. तसेच लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंदविलं गेल्याचा बनाव रचला होता. त्यानं इंदोरा चौक येथे रजत टॉवरमध्ये कार्यालय थाटून तक्रारदार महिला आणि इतर गुंतवणूकदारांना आकर्षित केलं.

# विनोद खटके यांचा वाढदिवस व्ही एस पँथर्स जनसेवा दिवस म्हणून साजरा करणार

**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांचा वाढदिवस प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाभरात जनसेवा दिवस म्हणून साजरा करणार. यामध्ये वाढदिवसानिमित्त विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय येथे सकाळी ११ वाजता रुग्णांच्या नातेवाईकांसाठी भोजनदान करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थी आघाडीच्या वतीने खुशी ग्राम येथील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य व स्पोर्ट ड्रेस वितरण करण्यात येणार आहे.



त्यानंतर लातूर जिल्ह्यातील ऑटो चालकांना ऑटो युनियनच्या वतीने सवलतीच्या दरात इन्शुरन्स आणि पी यू सी मोफत काढून देण्यात येणार आहे. तसेच लातूर शहर वाहतूक आघाडीच्या वतीने संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयासमोर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

तसेच माता रमाई रुग्णालय येथे फळ वाटपाचा कार्यक्रम शहर ऑटो युनियनच्या वतीने करण्यात येणार आहे. निलंगा तालुक्यामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच बाल सदन येथे विद्यार्थ्यांना फळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. चाकूर तालुक्यामध्ये जिल्हाध्यक्ष शरद किनीकर तालुकाध्यक्ष अजय वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली भव्य नेत्ररोग तपासणी व उपचार शिबिर घेण्यात येणार आहे आणि भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन चाकूर तालुक्याच्या वतीने चाकूर येथे करण्यात आले आहे. औसा तालुक्यामध्ये ग्रामीण रुग्णालय येथे फळ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. असे अनेक जनसेवेचे उपक्रम राबवून सं. अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. अशी माहिती प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के यांनी दिली.



## एसटी महामंडळातर्फे विद्यार्थ्यांना मिळणार 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड; आधार संलग्न सरल व अपार क्रमांक अनिवार्य

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य परिवहन महामंडळातर्फे विविध सामाजिक घटकांना प्रवास भाड्यात देण्यात येणाऱ्या सवलतींसाठी आता आधारकार्ड संलग्न 'एनसीएमसी अनेब्ल्ड स्मार्ट कार्ड' वितरीत करण्यात येत आहे. लवकरच शालेय व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सवलतीच्या पासेसकरिताही या कार्डची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. शासनाच्या ९ ऑक्टोबर २०१८ च्या निर्णयानुसार सवलतधारी प्रवाशांना स्मार्ट कार्ड देण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार राज्य परिवहन महामंडळ, मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक यांच्या संयुक्त विद्यमाने हे कार्ड देण्याची कार्यवाही सर्व आगारांमध्ये सुरू आहे. १६ फेब्रुवारी २०२६ पासून अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला सवलतधारी प्रवाशांसाठी कार्ड नोंदणी व वितरण प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, याच धर्तीवर आता नजीकच्या काळात विद्यार्थ्यांनाही हे स्मार्ट कार्ड दिले जाणार आहे.




शालेय, शैक्षणिक, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता 'सरल' व 'अपार' क्रमांक संलग्न एनसीएमसी कार्ड प्राप्त होणार आहे. यासाठी हे दोन्ही क्रमांक विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाशी जोडलेले असणे अनिवार्य आहे. शालेय विद्यार्थ्यांना मासिक पासाकरिता लागणाऱ्या या स्मार्ट कार्डचा मागणी अर्ज एसटी महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर मोफत उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अर्जात नमूद केलेली माहिती व जोडलेली आवश्यक कागदपत्रे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक असून, त्यानंतरच हा अर्ज आगारातील किंवा बसस्थानकावरील वाहतूक नियंत्रक अथवा अधिकृत एजंट यांच्याकडे जमा करावयाचा आहे. या कार्डच्या नोंदणी प्रक्रियेसाठी विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांचा चालू मोबाईल (भ्रमणध्वनी) क्रमांक देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

अर्जाची तपासणी व पडताळणी झाल्यानंतर आवश्यक शुल्क आकारून विद्यार्थ्यांना पावती दिली जाईल. नोंदणी पूर्ण झालेले हे एनसीएमसी कार्ड ३० दिवसांच्या आत प्रिंट करून संबंधित आगारास प्राप्त होईल आणि त्यानंतर आगारामध्ये पॉस (पीओएस) मशिनद्वारे हे कार्ड ॲक्टिव्ह करून ते प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना वितरित केले जाईल. तरी सर्व संबंधित विद्यार्थी आणि पालकांनी नोंदणी प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांची आगाऊ पूर्तता करून ठेवावी, असे आवाहन लातूर राज्य परिवहन महामंडळाच्या लातूर विभाग नियंत्रकांनी केले आहे.

## इंधन साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र, राज्य शासनाकडून उपाययोजना

**मुंबई/प्रतिनिधी :** औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहकांनी किरकोळ पेट्रोल पंपांवरून पेट्रोल-डिझेल खरेदी न करता घाऊक ग्राहकांसाठी असलेल्या इंधन केंद्रांमधूनच इंधन खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच कोणत्याही ग्राहकाला एका वाहनासाठी प्रतिदिन २०० लिटरपेक्षा अधिक डिझेल विक्री करता येणार नाही. या इंधनाची पुनर्विक्री करण्यासही मनाई करण्यात आली आहे.तेल विपणन कंपन्या आणि किरकोळ विक्री केंद्र चालकांनी या निर्बंधांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असून हा आदेश कमाल ९० दिवस किंवा पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहे.

जागतिक भू-राजकीय घडामोडींमुळे ऊर्जा पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने देशातील पेट्रोलियम उत्पादनांच्या उपलब्धतेवर ताण निर्माण झाला आहे. काही ठिकाणी औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहकांकडून किरकोळ पेट्रोल पंपांवरून मोठ्या प्रमाणात पेट्रोल व डिझेल खरेदी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने ११ जून २०२६ रोजी "मोटर स्पिरिट आणि उच्च गती डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे अस्थायी विनियमन) आदेश, २०२६" जारी करून इंधन विक्रीवर तात्पुरते निर्बंध लागू केले आहेत. राज्य शासनानेही १२ जून २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.यापूर्वी राज्य शासनाने ५ जून २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे पेट्रोलियम उत्पादनांची साठेबाजी, काळाबाजार, किरकोळ विक्री केंद्रांमधून टँकर किंवा बाउजरमध्ये अनधिकृत इंधन भरणे, इंधनात भेसळ, गळती, अनधिकृत हस्तांतरण, जादा दर आकारणी; तसेच निकृष्ट दर्जाचे इंधन पुरवठा यांसारख्या गैरप्रकारांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, नियंत्रक शिधावाटप, संचालक नागरी पुरवठा, उपायुक्त पुरवठा, जिल्हा पुरवठा अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच पोलीस उपअधीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेले सर्व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

राज्य शासनाने सर्व संबंधित यंत्रणांना इंधन साठेबाजी, काळाबाजार व इतर गैरप्रकारांवर कठोर नजर ठेवून दोषींविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.



# सेवा, संघर्ष, समता आणि सामाजिक न्यायाचा ध्यास : रक्तदानापासून, मोफत सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यापर्यंत विनोद खटके नावाचा समाजपरिवर्तनाचा प्रवाह







समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देत वाढदिवसालाही समाजसेवेचा उत्सव बनवणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व समाजात अनेक व्यक्ती यशस्वी होतात, काही लोकप्रिय होतात, तर काही सत्तेच्या आणि पदाच्या माध्यमातून ओळख निर्माण करतात. मात्र समाजाच्या दुःखात धावून जाणारे, गरजूंना आधार देणारे, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारे आणि स्वतःचा वाढदिवसही समाजसेवेला अर्पण करणारे व्यक्तिमत्त्व विरळाच आढळते. लातूर जिल्ह्यातील युथ आयकॉन विनोद खटके हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे ज्यांनी सेवा, संघर्ष, समता आणि सामाजिक न्याय या चार स्तंभांवर आपले संपूर्ण सामाजिक कार्य उभे केले आहे.

२० जून हा विनोद खटके यांचा वाढदिवस. मात्र त्यांच्या दृष्टीने वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छांचा वर्षाव, केक कापणे किंवा बॅनरबाजी नव्हे. त्यांच्या दृष्टीने वाढदिवस म्हणजे समाजासाठी आणखी काही चांगले करण्याची संधी. म्हणूनच दरवर्षी त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक, धार्मिक आणि मानवतावादी उपक्रमांचे आयोजन केले जाते. दर्ग्यावर चादर अर्पण करून सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला जातो. सिद्धेश्वर मंदिरात महाआरती आयोजित करून सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली जाते. सरकारी रुग्णालयातील रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना फळांचे वाटप केले जाते. गोशाळेत गायींना चारा वाटप केला जातो. भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले जाते. वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना कपडे आणि अन्नधान्य वाटप केले जाते. विद्यार्थ्यांना त्यांच्या वजनाएवढ्या शालेय साहित्याची तुला करून शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे त्यांचा वाढदिवस हा वैयक्तिक उत्सव न राहता समाजसेवेचा लोकोत्सव बनला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, बंधुता आणि न्यायाचा विचार केवळ भाषणांमध्ये न ठेवता प्रत्यक्ष कृतीत उतरवणे हेच त्यांचे खरे स्मरण आहे. विनोद खटके यांनी हाच विचार आपल्या कार्याचा पाया बनवला. दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने इतर दिखाऊ खर्च आणि अनावश्यक उत्सव बाजूला ठेवून त्यांनी समाजोपयोगी कार्याला प्राधान्य दिले. त्यातून सुरू झाला सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा आणि आज तो समाजपरिवर्तनाची चळवळ बनला आहे.

गेल्या सात वर्षांपासून व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या माध्यमातून त्यांनी २३० हून अधिक सर्वधर्मीय जोडप्यांचे विवाह पूर्णपणे निशुल्क लावले आहेत. हिंदू, मुस्लिम, बौद्ध अशा सर्व धर्मीय समाजातील जोडप्यांना एकत्र आणून विवाह लावणे हे केवळ सामाजिक कार्य नाही, तर सामाजिक एकात्मतेचे उदाहरण आहे. विवाहासाठी मंगळसूत्र, कपडे, संसारोपयोगी साहित्य, विवाहाची संपूर्ण व्यवस्था आणि पाहुण्यांसाठी भोजन व्यवस्था उपलब्ध करून देत त्यांनी अनेक गरीब कुटुंबांना आधार दिला आहे.

आजच्या काळात मुलीच्या विवाहासाठी अनेक कुटुंबे कर्जबाजारी होतात. अशा परिस्थितीत हा उपक्रम शेकडो कुटुंबांसाठी वरदान ठरला आहे. या विवाह सोहळ्यातून समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश समाजाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे.

समाजकार्य म्हणजे फक्त एका दिवसाचा कार्यक्रम नसतो. ते लोकांच्या दुःखात सातत्याने उभे राहण्याचे नाव असते. विनोद खटके यांचे कार्य याच अर्थाने मोठे आहे. सरकारी रुग्णालयात दाखल रुग्णांच्या नातेवाईकांना अन्नदान करणे, गरजू रुग्णांना मदत करणे, वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देणे, गरजू कुटुंबांना आर्थिक आधार देणे अशी अनेक कामे त्यांनी सातत्याने केली आहेत.

रुग्णवाहिका नसल्याने अनेकांचे जीव धोक्यात येतात हे लक्षात घेऊन त्यांनी मोफत ॲम्ब्युलन्स सेवा सुरू केली. या सेवेचा लाभ हजारो गरजूंना झाला आहे. संकटाच्या वेळी मदतीला धावून जाणे हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख बनली आहे.

शिक्षण हे परिवर्तनाचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे. बाबासाहेबांच्या याच विचाराने प्रेरित होऊन त्यांनी गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, पुस्तके, वह्या तसेच शैक्षणिक मदत उपलब्ध करून दिली. अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास यामुळे सुलभ झाला आहे.

रक्तदान म्हणजे जीवनदान या विचारातून त्यांनी अनेक भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन केले. अनेक तरुणांना रक्तदानासाठी प्रेरित केले. समाजात मानवतेची भावना रुजविण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.

विनोद खटके यांचे कार्य केवळ समाजसेवेपुरते मर्यादित नाही, तर सामाजिक न्यायासाठी संघर्ष करण्याची परंपराही त्यांनी जपली आहे. एखाद्या पीडित, वंचित किंवा अन्यायग्रस्त व्यक्तीवर अन्याय झाला तर तिच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका त्यांनी कायम घेतली आहे. अनेक प्रश्नांवर त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले, आंदोलने केली आणि न्यायासाठी संघर्ष केला.

लातूर शहरात उभारण्यात येणाऱ्या ७२ फूट उंच क्रांतिसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी जनआंदोलन उभारण्यात त्यांची भूमिका विशेष उल्लेखनीय राहिली आहे. या स्मारकाला मंजुरी मिळावी, निधी उपलब्ध व्हावा आणि लातूरमध्ये बाबासाहेबांना साजेसा भव्य पुतळा उभा राहावा यासाठी त्यांनी अनेक आंदोलने, निवेदने आणि धडक महामोर्चांचे नेतृत्व केले. या आंदोलनामुळे बाबासाहेबांप्रती असलेली त्यांची निष्ठा आणि समाजासाठीचा संघर्ष अधोरेखित झाला.

अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, पीडितांना न्याय मिळावा आणि सामाजिक अन्यायाला आळा बसावा यासाठी त्यांनी मोठ्या मोर्चाचे नेतृत्व केले. सामाजिक न्यायासाठी संघर्ष करणे ही त्यांची ओळख बनली आहे.

संविधान दिनाच्या निमित्ताने संविधानाचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचावे यासाठी त्यांनी मराठवाड्यात प्रथमच सुमारे ५०० फूट लांबीच्या तिरंगा ध्वज रॅलीचे आयोजन केले. संविधान, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा हा उपक्रम मोठ्या प्रमाणात गाजला. संविधानिक मूल्यांविषयी जनजागृती करण्यासाठी हा एक ऐतिहासिक उपक्रम मानला जातो.

भगवान बुद्धांनी धम्मात दान, करुणा, मैत्री आणि सेवा यांना अत्यंत महत्त्व दिले आहे. बाबासाहेबांनी सामाजिक न्यायाचा मार्ग दाखवला. या दोन्ही विचारांचा संगम जर कुठे दिसत असेल, तर तो विनोद खटके यांच्या कार्यातून दिसून येतो. कारण ते केवळ नाव कमावण्यासाठी कार्य करत नाहीत, तर लोकांच्या आयुष्यात प्रत्यक्ष बदल घडवण्यासाठी झटत आहेत.

आजच्या काळात वाढदिवसानिमित्त लाखो रुपयांचे बॅनर, फटाके आणि दिखाऊ कार्यक्रम पाहायला मिळतात. मात्र विनोद खटके यांनी वाढदिवसाची व्याख्याच बदलून टाकली आहे. शुभेच्छांपेक्षा रक्तदान, सत्कारांपेक्षा अन्नदान, हार-तुऱ्यांपेक्षा गरजूंना मदतीचा हात आणि स्वतःच्या आनंदापेक्षा इतरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे हीच त्यांच्या वाढदिवसाची खरी ओळख बनली आहे.

रक्तदान, अन्नदान, विद्यार्थ्यांना मदत, सर्वधर्मीय विवाह, सामाजिक न्यायासाठीचा संघर्ष, संविधान जनजागृती, रुग्णसेवा, वृद्धांची सेवा, सर्वधर्मसमभाव आणि मानवतेचा संदेश ही केवळ कामांची यादी नाही; तर एका व्यक्तीच्या समाजाप्रती असलेल्या बांधिलकीची साक्ष आहे.

आज समाजाला अशाच आधारवड व्यक्तींची गरज आहे, जे दुःखात धावून जातात, अन्यायाविरुद्ध उभे राहतात आणि माणुसकीची ज्योत तेवत ठेवतात. विनोद खटके हे त्यापैकीच एक नाव आहे.

‘‘रक्तदानात त्यांना मानवता दिसते, सर्वधर्मीय विवाहात समता दिसते, संविधान रॅलीत राष्ट्रप्रेम दिसते, अन्यायाविरुद्धच्या संघर्षात न्याय दिसतो, आणि गरिबांच्या चेहऱ्यावरील हास्यात त्यांचा खरा वाढदिवस दिसतो.’’

२० जून हा त्यांचा जन्मदिन असला, तरी अनेक गरजू, पीडित आणि वंचितांसाठी तो आशेचा, विश्वासाचा आणि नव्या उमेदीचा दिवस असतो. कारण काही माणसं स्वतःसाठी जगतात, तर काही माणसं संपूर्ण समाजासाठी. विनोद खटके हे त्यापैकीच एक नाव आहे.



लेखक :
**अजय सूर्यवंशी**
Founder & Director
ओजस सोलर पॉवर टेक्नोलॉजी प्रा. लि., लातूर

## संपादकीय...

### जनसेवेचा उत्सव : व्ही. एस. पँथर्सचे संस्थापक अध्यक्ष विनोदजी खटके यांचे प्रेरणादायी कार्य

आजच्या काळात वाढदिवस साजरा करण्याच्या पद्धतीत मोठा बदल झाला आहे. अनेकदा वाढदिवस म्हणजे बॅनरबाजी, शक्तिप्रदर्शन, सोशल मीडियावरील शुभेच्छांचा वर्षाव आणि दिखाऊ कार्यक्रम असे चित्र पाहायला मिळते. मात्र काही व्यक्ती अशा असतात की त्या स्वतःच्या आनंदापेक्षा समाजाच्या आनंदाला अधिक महत्त्व देतात. व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोदजी खटके हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. २० जून हा त्यांचा जन्मदिन असला तरी तो केवळ त्यांच्या कुटुंबीयांचा किंवा मित्रपरिवाराचा उत्सव नसतो. हा दिवस अनेक गरजू, वंचित आणि पीडितांसाठी मदतीचा हात घेऊन येणारा दिवस ठरतो. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसाला समाजसेवेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. विनोदजी खटके यांनी आपल्या सामाजिक कार्याची उभारणी सेवा, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर केली आहे. कोणत्याही जाती-धर्माचा भेद न करता सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी झटणे ही त्यांच्या कार्याची प्रमुख ओळख आहे. आज अनेक संघटना विशिष्ट विचारधारा किंवा समाजापुरत्या मर्यादित दिसतात. मात्र विनोदजी खटके यांनी ‘‘मानवता हा धर्म आणि माणुसकी हीच जात‘‘ हा विचार स्वीकारून सर्व समाजघटकांना जोडण्याचे काम केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरे, अन्नदान, फळवाटप, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण, वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना मदत आणि विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे वाढदिवस हा जनसेवेचा उत्सव बनला आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान या विचारातून त्यांनी हजारो युवकांना रक्तदानासाठी प्रेरित केले आहे. अनेक रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यासाठी त्यांनी उभारलेले रक्तदानाचे जाळे समाजासाठी मोठा आधार ठरले आहे. शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, याची जाणीव ठेवून त्यांनी गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, पुस्तके आणि विविध प्रकारची शैक्षणिक मदत उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन त्यांनी सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याची चळवळ उभी केली. या उपक्रमामुळे अनेक गरीब कुटुंबांवरील आर्थिक भार कमी झाला आहे. गेल्या सात वर्षांत शेकडो जोडप्यांचे विवाह निशुल्क लावून देत त्यांनी सामाजिक बांधिलकीचे वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. हिंदू, मुस्लिम, बौद्ध आणि इतर धर्मीय समाजातील जोडप्यांना एकत्र आणणारा हा उपक्रम सामाजिक सलोख्याचे प्रतीक बनला आहे. विवाहापुरतेच नव्हे तर त्या कुटुंबांचा संसार सुरळीत व्हावा यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण झाले आहेत. आरोग्य क्षेत्रातही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. गरीब आणि गरजू रुग्णांना मदत करण्यासाठी त्यांनी मोफत रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून दिली आहे. या सेवेचा लाभ हजारो रुग्णांना झाला आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी भोजनदानाची व्यवस्था करणे हा त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. संकटाच्या काळात दिलेला हा आधार अनेक कुटुंबांसाठी दिलासादायक ठरतो. विनोदजी खटके यांचे कार्य केवळ समाजसेवेपुरते मर्यादित नाही. सामाजिक न्यायासाठी संघर्ष करणे ही देखील त्यांची ओळख आहे. अन्यायग्रस्तांच्या बाजूने उभे राहण्याची त्यांची भूमिका समाजात विश्वास निर्माण करणारी आहे. लातूरमध्ये उभारण्यात येणाऱ्या भव्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी त्यांनी उभारलेले जनआंदोलन विशेष उल्लेखनीय ठरले आहे. बाबासाहेबांप्रती असलेली त्यांची निष्ठा आणि सामाजिक बांधिलकी या आंदोलनातून दिसून आली. संविधान जनजागृतीसाठी त्यांनी आयोजित केलेली भव्य तिरंगा रॅली हा देखील एक अभिनव उपक्रम होता. संविधानिक मूल्यांचा प्रसार आणि राष्ट्रप्रेमाची भावना दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यंदाच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी मिलिंद नगर येथील माता रमाई बुद्ध विहारास भगवान गौतम बुद्धांची मूर्ती भेट देण्याचा निर्णय घेतला आहे. हा उपक्रम सामाजिक आणि वैचारिक दृष्टिकोनातून विशेष महत्त्वाचा आहे. भगवान बुद्धांनी जगाला करुणा, मैत्री, समता आणि प्रज्ञेचा संदेश दिला. बुद्धमूर्ती भेट देण्यामागे या मूल्यांचा प्रसार करण्याचा उद्देश आहे. समाजात शांतता आणि मानवतेचा विचार अधिक दृढ व्हावा, ही त्यामागील भावना आहे. आजच्या अस्थिर आणि तणावग्रस्त सामाजिक वातावरणात बुद्धांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे बुद्ध विहाराला दिलेली ही भेट केवळ धार्मिक कृती नसून सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणारी आहे. समाजात नेतृत्वाची कमतरता नाही, परंतु संवेदनशील आणि लोकाभिमुख नेतृत्वाची गरज नेहमीच भासते. विनोदजी खटके यांनी आपल्या कृतीतून अशा नेतृत्वाचे उदाहरण निर्माण केले आहे. त्यांनी युवकांना समाजकारणाची सकारात्मक दिशा दिली आहे. वाढदिवस हा स्वतःचा गौरव करण्याचा दिवस नसून समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असू शकतो, हे विनोदजी खटके यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. जनसेवा, समता, मानवता आणि सामाजिक न्याय या मूल्यांची ज्योत तेवत ठेवणारे त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा गौरव होणे हीच खऱ्या अर्थाने समाजाची प्रगती आहे.

## मानवता हा धर्म आणि माणुसकी हीच जात मानणारा युवा नेता विनोदभाऊ खटके

आजच्या या काळामध्ये युवक वेगवेगळ्या व्यसनांमध्ये समाज माध्यमांमध्ये गुंतून पडलेला असताना एक ध्येयवेढा युवक काही आपल्यासारख्या युवकांना एकत्र करून समाजाचे भले करण्यासाठी धडपडत आहे. सामाजिक कार्यातील एक मानबिंदू असावा, अशा पद्धतीचे नेतृत्व करणारा युवा नेता म्हणजेच विनोदभाऊ खटके. लातूर जिल्ह्यामध्ये अनेक सामाजिक संघटना, अनेक राजकीय पक्ष कार्यरत आहेत आणि प्रत्येक संघटना किंवा राजकीय पक्ष एक कुठल्यातरी जातीची किंवा धर्माची विचारधारा घेऊन वाटचाल करत आहेत.

परंतु, विनोद खटके हे जातीपातीच्या पलीकडे जाऊन फक्त माणुसकी जपण्यासाठी, समाजाचे ऋण फेडण्यासाठी धडपडत असतात. संघटनेच्या माध्यमातून काम करत असताना प्रत्येक महापुरुषाच्या जयंतीनिमित्त वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवून समाजापुढे एक आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न विनोद खटके हे आपल्या कार्याच्या माध्यमातून करत आहेत. सामाजिक न्यायाचे प्रतीक असणारे आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त संघटनेच्या वतीने विविध शाळेतील गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वितरण करणे आणि त्या माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीमागे पाठबळ उभे करणे, हे आपले कर्तव्य समजून विनोदभाऊ आपले काम करत असतात. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वेगवेगळ्या भागांमध्ये रक्तदान शिबिरांचे आयोजन करून गोरगरीब गरजू रुग्णाला



रक्तपुरवठा व्हावा यासाठी प्रयत्नशील असणारे नेतृत्व म्हणजे विनोद खटके.

कोणतीच राजकीय सामाजिक पार्श्वभूमी नसताना आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, हा एकमेव विचार डोक्यात ठेवून नेहमी समाजासाठी काम करायचे हे स्वतःशी ठरवून काम करणारे युवा नेते म्हणजे विनोद खटके. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी सर्व धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याच्या आयोजनातून अनेक गोरगरीब कुटुंबातील शेतमजुराच्या, बिगारी, कामगारांच्या, धुणी-भांडी करणाऱ्या महिलांच्या मुलींचे लग्न मोफत लावून एका भावाचे कर्तव्य विनोद खटके प्रतिवर्षी निभावत असतात.

सर्वधर्मीय विवाह सोहळ्यात लग्न लावून न थांबता त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याचे काम सुद्धा विनोद हे संघटनेच्या माध्यमातून करत असतात. कोणाच्या संसारामध्ये अडचणी निर्माण होत असतील तर दोन्ही कुटुंबातील लोकांना समोर बोलावून त्यांचे समुपदेशन करून त्यांचा संसार लावण्याचा प्रयत्न विनोद खटके करत असतात. लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये येणाऱ्या गोरगरीब रुग्णांना भोजनाची मदत व्हावी, यासाठी आठवड्यातून दोन वेळेस भोजनदानाची व्यवस्था विनोद खटके आणि संघटनेच्या माध्यमातून केलेली आहे.

विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयामध्ये आलेल्या रुग्णाला कधी कधी वेगवेगळ्या ठिकाणी विविध चाचण्या करण्यासाठी जावे लागते आणि त्याच्याकडे रुग्णवाहिका करण्या एवढे पैसे नसतात. त्यावेळी संघटनेच्या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून त्या रुग्णाला मदत केली जाते.

खाजगी रुग्णालयामध्ये एखाद्या रुग्णाची पैसे भरण्याची ऐपत नसल्यास येथील डॉक्टरांशी बोलून फीस कमी करण्याचा प्रयत्न विनोद खटके नेहमीच करत असतात. फक्त निवडणुकीच्या हंगामात काम करणारे अनेक नेते कार्यकर्ते समाजात आहेत पण बाराही महिने समाजातील लोकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी तत्पर असणारा एकमेव युवा नेता म्हणजे विनोद भाऊ खटके.

विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आंदोलन उभे करणे कधी संस्थाचालकाशी बोलणे कधी ट्युशन चालकाशी बोलणे अशा माध्यमातून विद्यार्थ्यांना मदत करणे हे आपले कर्तव्य समजून विनोद खटके हे काम करत असतात.

ग्रामीण भागातील ग्रामीण भागातील विविध अडचणी सोडविण्यासाठी संघटनेच्या तालुक्याच्या पदाधिकाऱ्यांच्या मदतीने ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न संघटनेच्या माध्यमातून विनोद खटके करत असतात.

संघटनेतील पदाधिकाऱ्यांशी पारिवारिक संबंध प्रस्थापित करून परिवारातील सदस्याप्रमाणे वागणूक देणे, हा विनोद भाऊ खटके यांचा स्थायी स्वभाव आहे. कोण मोठा नाही कोण छोटा नाही आपण सर्वजण सारख्या आहोत ही भावना ठेवून संघटन चालवणारे नेतृत्व म्हणजे विनोद खटके.




एखाद्या राजकीय सामाजिक शैक्षणिक प्रश्न निर्माण झाला असेल त्याच्या विरोधात आंदोलन उभा करण्याची धमक असणार नेतृत्व म्हणजे विनोद भाऊ खटके. बहुआयामी व्यक्तिमत्व असलेले विनोद खटके यांचा शनिवारी (दि. २० जून) रोजी वाढदिवस आहे. विनोद भाऊ खटके यांना निरोगी आणि दीर्घायुषी वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा!!

**रवि कुरील**, लातूर.
मार्गदर्शक:- व्ही एस पँथर्स युवा संघटन महाराष्ट्र राज्य

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात पदवीदानाचा सोहळा; डॉ. आबासाहेब देशमुख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण

**अंबाजोगाई/प्रतिनिधी** : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात पदवीधर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करणारा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ शनिवार, दि. २० जून २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता उत्साहात संपन्न होणार आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण टप्पा असलेल्या या समारंभात मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या परिश्रमांचा गौरव करणारा ठरणार आहे. उच्च शिक्षण, करिअर आणि सामाजिक जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन मिळणार असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले. या पदवीदान सोहळ्यास विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## दिल्ली उच्च न्यायालयाची टेलिग्रामवर तात्पुरती बंदी कायम

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयानं ऱ्एएऊ ळउ २०२६ पुनर्परीक्षेदरम्यान टेलिग्रामवर लादण्यात आलेली तात्पुरती बंदी कायम ठेवली आहे. न्यायालयानं सरकारच्या आदेशाला वैध ठरवत टेलिग्रामच्या याचिकेला फेटाळलं. या निर्णयानं परीक्षांमध्ये डिजिटल प्लॅटफॉर्म्सच्या नियंत्रणासंदर्भात महत्त्वपूर्ण निकष स्थापित केले आहेत.न्यायालयाचा निर्णय : न्यायालयानं स्पष्ट केलं की, आणीबाणीच्या स्वरूपातील आदेश देताना सरकारी यंत्रणांनी योग्य प्रक्रिया पाळली होती. आणीबाणीच्या स्वरूपातील आदेश असल्यानं प्रतिसादकानं कठोरपणे प्रक्रिया पाळली, असं न्यायालयानं निरीक्षण नोंदवलं. टेलिग्रामनं कारणं न कळवल्याचा मुद्दा उपस्थित केला होता, मात्र न्यायालयानं तो फेटाळला.न्यायालयाचा म हत्त्वपूर्ण निर्णय : दोन्ही आदेश संबंधित पुराव्यांवर आधारित आहेत आणि त्यात कारणे स्पष्टपणे नमूद केली आहेत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. याव्यतिरिक्त, न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला की, 'इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट'च्या कलम २(१) अन्वये 'माहिती'च्या व्याख्येत टेलिग्रामसारख्या प्लॅटफॉर्मचा समावेश केला जाऊ शकतो. टेलिग्रामने यापूर्वी या व्याख्येतून वगळले जाण्याची मागणी केली होती.तात्पुरती बंदी कायम : नीट २०२६ पुनर्परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी ही तात्पुरती बंदी म्हणून घेण्यात आली होती. उच्चस्तरीय परीक्षांमध्ये गैरप्रकार रोखण्यासाठी मेसेजिंग ॲप्सवर नियंत्रण ठेवणे गरजेचं असल्याचं सरकारचं मत न्यायालयानं मान्य केलं. या निर्णयामुळे भविष्यात अशा परीक्षांदरम्यान सोशल मीडिया आणि मेसेजिंग प्लॅटफॉर्म्सवर अधिक कठोर कारवाई होण्याची शक्यता वाढली आहे. टेलिग्राम कंपनीनं याचिकेद्वारे बंदीला आव्हान दिलं होतं. मात्र न्यायालयानं सरकारच्या भूमिकेला बळकटी देताना राष्ट्रीय हित आणि परीक्षेची पारदर्शकता याला प्राधान्य दिलं. हा निकाल फक्त ऱ्एएऊ परीक्षेपर्यंत मर्यादित न राहता इतर स्पर्धा परीक्षांसाठीही मार्गदर्शक ठरण्याची शक्यता आहे.

## एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणासाठी सूचना आणि अभिप्राय पाठविण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील एकल महिलांना सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येत आहे. हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक करण्यासाठी राज्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक आणि विषयतज्ज्ञ यांनी आपल्या सूचना व अभिप्राय ८२०८५८९१९५ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावेत, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे महिला व बालविकास अधिकारी शरद कुऱ्हाडे यांनी केले आहे. एकल महिलांसमोरील समस्या केवळ मांडण्याऐवजी त्या सोडविण्यासाठी शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणत्या नवीन योजना सुरू कराव्यात; तसेच विद्यमान योजनांमध्ये, कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत, याबाबत सविस्तर सूचना पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अभिप्राय पाठविताना केवळ मत नोंदविण्याऐवजी संबंधित विषयाची पार्श्वभूमी, सुचविलेली उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि अपेक्षित परिणाम यांचा समावेश असलेला सुस्पष्ट प्रस्ताव सादर करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. एकल महिलांसाठी तयार होणारे धोरण अधिक प्रभावी आणि सर्वसमावेशक व्हावे, यासाठी समाजातील एकल महिला; तसेच सर्व संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे नमूद करून अधिकाधिक नागरिकांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असेहीकरण्यात आले आहे.

# आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित सहभागी व्हावे

## बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीचे आवाहन!

**बीड/प्रतिनिधी** : विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याचे अनुदानासाठी निधीची तरतूद उपलब्ध करून द्या या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने दिनांक ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी व आपल्या हक्काचा टप्पा वाढीचा निधी पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे)







मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे.

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तात्कालीन राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन या संदर्भातला शासननिर्णय ही काढला होता. दरम्यान निवडणुका होऊन पुन्हा शिवसेना भाजपाचे सरकार सत्तेत आले. या नवीन सरकारच्या विधिमंडळाची दोन अधिवेशन पार पडली, परंतु या अधिवेशना दरम्यान वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद मात्र झाली नाही. त्यामुळे हजारो शिक्षकांचा हिरमोड झाला.

परंतु सरकारने आमचा, आमच्या वयाचा, आमच्या सेवेचा आमच्या घरांचा आणि घरातली व्यक्तींचा विचार करून आमच्या पुढील वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करावी या मागणीसाठी विनाअनुदानित शिक्षकांसाठी कार्यरत असणारी मातृ संघटना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा १८ वा दिवस आहे.

या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रताप पवार सर, उपाध्यक्ष श्री. रामदास जामकर सर , उपाध्यक्ष श्री. अरविंद सौंदलकर सर, जिल्हा सचिव श्री. शेख सर जिल्हा संघटक प्रताप देशमुख सर, जिल्हा सहसंघटक श्री. बाळासाहेब नागरगोजे सर, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे मॅडम, महिला सचिव सुरेखा गायकवाड मॅडम, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अशोक मोरे सर, बीड तालुका अध्यक्ष श्री. भागवत यादव सर, गेवराई तालुका अध्यक्ष श्री. दीपक गरूड सर, आष्टी तालुका अध्यक्ष श्री. रविंद्र भुकन सर,पाटोदा तालुका अध्यक्ष श्री. अंकुश गवळी सर,शिरूर तालुका अध्यक्ष श्री. दशरथ साबळे सर, माजलगाव तालुका अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तौर सर, वडवणी तालुका अध्यक्ष श्री. वैजनाथ शिंदे सर ,परळी तालुका अध्यक्ष श्री गोविंद आघाव सर , धारूर तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर मुंडे यांच्या सह जिल्हा विविध पदाधिका-यांनी केले आहे.

# शालेय शिक्षण विभाग आणि गुगल दरम्यान कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षणासाठी करार

## राज्यातील चार लाख शिक्षकांना मिळणार लाभ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे प्रगत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि गुगल फॉर एज्युकेशन यांच्यादरम्यान उद्देशपत्रावर स्वाक्षरी करण्यात आली. या उपक्रमाअंतर्गत पुढील दीड वर्षांच्या कालावधीत राज्यातील चार लाखांहून अधिक शिक्षकांना 'गुगल एआय एज्युकेटर सिरीज' अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात गुगल फॉर एज्युकेशन विभागाचे उपाध्यक्ष ख्रिस फिलिप्स, तर शालेय शिक्षण विभागाच्या वतीने सहसचिव ताशीलदार यांनी उद्देशपत्रावर स्वाक्षरी केली.

यावेळी बोलताना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांना आधुनिक कौशल्यांनी सुसज्ज करणे ही काळाची गरज आहे. या कराराअंतर्गत टप्प्याटप्प्याने शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रारंभी निवडक मास्टर ट्रेनर्सना



प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतर हे प्रशिक्षित शिक्षक राज्यभरातील इतर शिक्षकांना प्रशिक्षण देतील. या माध्यमातून राज्यातील प्रत्येक शाळेपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेवरील प्रशिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या उपक्रमासाठी राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसून संपूर्ण प्रशिक्षण गुगलमार्फत विनामूल्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. शिक्षकांच्या डिजिटल सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली असून या संपूर्ण प्रक्रियेवर महाराष्ट्र शासनाचे नियंत्रण राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले की, २१व्या शतकात शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व झपाट्याने वाढत आहे. शासकीय तसेच अनुदानित शाळांमधील शिक्षकांना जागतिक दर्जाच्या संस्थेकडून प्रशिक्षण मिळावे, अशी विभागाची अपेक्षा होती. गुगल फॉर एज्युकेशन सोबत झालेल्या या सहकार्यामुळे राज्यातील लाखो शिक्षकांना अत्याधुनिक प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे. मास्टर ट्रेनर्सच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक शाळेपर्यंत हे प्रशिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून त्यामुळे शिक्षकांसह विद्यार्थ्यांनाही मोठा फायदा होईल. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत आवश्यक जनजागृती निर्माण होण्यासही मदत मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

या सहकार्याअंतर्गत शिक्षकांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता वाढविणे, डिजिटल कौशल्ये विकसित करणे, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये स्थानिकीकरण केलेली प्रशिक्षण सामग्री उपलब्ध करून देणे, शिक्षकांना सुरक्षित डिजिटल ओळख प्रदान करणे तसेच आधुनिक गुगल एआय साधनांचा शैक्षणिक वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. याशिवाय शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला चालना देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांशी सुसंगत असलेल्या या उपक्रमामुळे तंत्रज्ञानाधारित अध्यापन पद्धतींचा प्रसार होण्यास मदत होईल. तसेच आयसीटी प्रयोगशाळा, कनेक्टेड वर्गखोल्या, स्मार्ट वर्गखोल्या, डिजिटल ग्रंथालये आणि भाषा प्रयोगशाळा यांसारख्या डिजिटल शिक्षण सुविधांना बळकटी मिळणार आहे.

कार्यक्रमास शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, सहसचिव श्री.ताशीलदार, गुगल फॉर एज्युकेशनचे वरिष्ठ अधिकारी संजय जैन, विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

## एका बोकडामुळे तस्करांचा संपूर्ण गेम उलथला; महामार्गावर पोलिसांचा हाय-व्होल्टेज ड्रामा

**ठाणे/प्रतिनिधी** : खरे तर कधी कधी एखादी साधी कारवाईही मोठे रहस्य उघड करते. ठाण्यात एका वाहतूक वाहनाची नियमभंगाची पडताळणी सुरु झालेल्या एका प्रकारणात असे काही रहस्य समोर येईल असे कोणालाच वाटले नव्हते. ज्यामुळे पोलिसांनाही मोठा धक्का बसला आहे. नक्की काय घडलं आहे, त्याबाबत सविस्तर जाणून घेऊयात.

मिळालेल्या माहितीनुसार, ठाणे वाहतूक शाखेच्या नौपाडा या वाहतूक उपविभागाच्या पथकाने घोडबंदर रोड या परिसरात एका रिक्षामधून बोकडाची बेकायदा होत होती. हे त्यांच्या लक्षात आहे. त्यानंतर संबंधित रिक्षाचालकाविरोधात ई-चलानद्वारे ऑनलाइन दंडाची कारवाई ही करण्यात आली होती.

मात्र काही वेळानंतर मुंब्रा येथील एक रिक्षाचालक घटनास्थळी आला आणि त्याने आपली रिक्षा ही मुंब्रा येथे असताना दंड आकारल्याचा संदेश त्याला कसा आला असा प्रश्न त्याने तिथं असलेल्या पोलिसांना विचारला. याच तक्रारीनंतर वाहतूक पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यास सुरुवात केली.

पोलिस तपासादरम्यान दंड लावण्यात आलेल्या रिक्षेचा आणि मुंब्रा येथील रिक्षेचा जो नोंदणी क्रमांक होता, तो एकच असल्याचे समोर आले. त्यामुळेच पोलिसांचा संशय अधिकच बळावला. पुन्हा एकदा दोन्ही वाहनांची कागदपत्रे तपासली आणि तेव्हा मूळ रिक्षा ही शेर मोहम्मद यांच्या वडिलांच्या नावावर नोंदणीकृत असल्याची माहिती समोर आली.यानंतर संबंधित रिक्षावर बनावट नंबर प्लेट लावून ती रस्त्यावर चालवली जात होती, असे समोर आले शिवाय बनावट क्रमांकाच्या आधारे वाहन चालवून वाहतूक नियमांची सुद्धा फसवणूक केल्याचा प्रकार समोर येताच, पोलिसांनी तातडीने कारवाई केली. पोलिसांनी या प्रकरणा बनावट नंबर प्लेट असलेली रिक्षा जप्त केली असून चालकाविरोधातही नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# अंशतः अनुदानित शाळेच्या वाढीव टप्पा अनुदानासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार - डॉ नरेंद्र काळे

## डॉ.नरेंद्र काळे व विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांची भेट; शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा

**बीड/प्रतिनिधी** : राज्यातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पदवीधर युवकांचे कोणतेही प्रश्न असोत, ते मार्गी लावण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहील. वाढीव टप्पा अनुदानाच्या पुढील आंदोलनातही सक्रिय सहभाग घेऊन शासनाला सकारात्मक निर्णय घेण्यास भाग पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते मा. शरद पवार यांचे एकनिष्ठ समर्थक, शिक्षक नेते, राष्ट्रवादी पदवीधर संघटनेचे प्रमुख तसेच महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबईचे अधिसभा सदस्य आदरणीय डॉ. नरेंद्र काळे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांच्याशी बोलताना सांगितले. डॉ नरेंद्र काळे हे गुरूवार दि.१८ रोजी बीड शहरात आले होते. या वेळी जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांनी त्यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान डॉ काळे आणि जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांच्यात शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी, विनाअनुदानित शाळांचा अनुदानाचा प्रश्न तसेच राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्पा मिळण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी डॉ. नरेंद्र काळे यांचा शांत, संयमी, मनमिळाऊ आणि सर्वसामान्यांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्याचा त्यांचा स्वभाव असल्याचे जवळून अनुभवास आले.

राज्यातील विनाअनुदानित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांबाबत डॉ. काळे यांना असलेली आत्मीयता, जिव्हाळा आणि बांधिलकी विशेषत्वाने जाणवली. तसेच विनाअनुदानित शाळांच्या हक्काच्या पगारासाठी डॉ. नरेंद्र काळे हे सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करत असून, राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी ते नेहमीच आग्रही भूमिका घेत असल्याचे त्यांच्या बोलण्यातून यावेळी स्पष्ट झाले.

यापूर्वी विना अनुदानित शाळेंच्या वाढीव टप्पा अनुदानासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर झालेल्या आंदोलनाला बळ देण्यासाठी डॉ. नरेंद्र काळे यांनी स्वतः पुढाकार घेत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष मा. शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह विरोधी पक्षातील अनेक प्रमुख नेत्यांचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याचे महत्त्वपूर्ण भूमिका आणि कार्य केले होते.

डॉ नरेंद्र काळे यांच्या या सकारात्मक भूमिकेमुळे राज्यातील २०, ४० आणि ६० टक्के अनुदान घेणाऱ्या अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्पा मंजूर होण्यास मोठी मदत झाली होती त्यांच्या या सकारात्मक भूमिके बद्दल विनाअनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विनाअनुदानित शाळांच्या वतीने डॉ. काळे यांचे आभार मानले. या आभारा नंतर प्रतिक्रिया देताना डॉ. नरेंद्र काळे म्हणाले, ''शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पदवीधर युवकांचे कोणतेही प्रश्न असोत, ते मार्गी लावण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन.


वाढीव टप्पा अनुदानाच्या पुढील



आंदोलनातही सक्रिय सहभाग घेऊन शासनाला सकारात्मक निर्णय घेण्यास भाग पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे.'' त्यांच्या या आश्वासक भूमिकेमुळे शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी काळात अनुदान व इतर प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अधिक बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# साहित्याच्या बागेत करपली भाकर हे एक वास्तवदर्शी फुल उमलले!- डॉ. श्रीपाल सबनीस

**पुणे/प्रतिनिधी :** एस एम जोशी फाउंडेशन पत्रकार भवन शेजारी गांजवे चौक नवी पेठ पुणे येथील एस एम जोशी सभागृहात वैशाली वादळ वारा काव्य महोत्सव व भव्य खुले कवी संमेलन व वैशाखी वादळ वारा उत्कृष्ट साहित्य कलाकृती पुरस्कार २०२६ चा पुरस्कार वितरण सोहळा प्रमुख उपस्थित अतिथी डॉक्टर श्रीपाल सबनीस (८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष पिंपरी पुणे) मा प्रकाशराव देशमुख (मा सुप्रिंडेंट ऑफ पोलीस एस पी) मा मिटकरी साहेब संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत मोतीराम जोगदंड यांच्या हस्ते साहित्यिक समाजभूषण मा श्री उत्तमराव दासू तरकसे आसरडोहकर (महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करपली भाकरकार ज्येष्ठ साहित्यिक कवी विचारवंत ) यांच्या करपली भाकर या कथासंग्रहाला या अगोदर महाराष्ट्र राज्य शासनाची प्रशासकीय सेवेतील वर्ग एक व दोनच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी महाराष्ट्र शासनाची एकमेव शासकीय संस्था यशदा पुणे व पुणे महानगरपालिका मराठी भाषा संवर्धन विभागाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट साहित्य कलाकृती पुरस्कार २०२६ चा




पुरस्कार सदर कथासंग्रहाला मिळालेला असून आत्ता वैशाखी वादळ वारा या



संस्थेचा सुद्धा सुरेश रामलिंग मिटकरी स्मृती उत्कृष्ट साहित्य कलाकृतीचा कथा गौरव पुरस्कार २०२६ मिळाल्याने मान्यवरांच्या हस्ते तो तरकसे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

सदर कार्यक्रमात डॉ श्रीपाल सबनीस साहेबांनी करपली भाकर या कथासंग्रहाचे लेखक श्री उत्तमराव तरकसे यांना वडीलकिच्या नात्याने जवळ बोलावून शेजारीच बसवून त्यांचे पाठीवर हात ठेवत कावेत घेत कौतुक केले व आपले विचार मांडताना साहित्याच्या बागेत करपली भाकर हे एक वास्तवदर्शी फुल उमलल...! असे गौरवोद्गार काढले तेव्हा लेखक उत्तमराव तरकसे यांनी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व पुरस्कार निवड समितीचे तसेच संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत जोगदंड यांचे आभार मानत साहित्य क्षेत्रातील चालते बोलते विद्यापीठ म्हणजे डॉक्टर श्रीपाल सबनीस सर त्यांनी माझ्या पाठीवर कौतुकाने ठेवलेला हात व मला मायेने त्यांच्या कावेत घेतल्याने माझे साहित्याचे जीवन भरून पावले व सार्थकी झाले असे उदगार काढत त्यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या आशीर्वादाच्या छत्रछायेखालीच राहणे पसंत केले

कार्यक्रमाच्या शेवटी जोगदंड सर यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या प्रमाणात उपस्थित सर्व साहित्यिक कवी चाहता वर्ग व पुरस्कार्थी व प्रमुख सन्माननीय यांच्या उपस्थितीने गच्च भरलेल्या सभागृहातील सर्व उपस्थितांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## लातूर जिल्ह्यात शिक्षक पात्रता परीक्षेच्या ४१ परीक्षा केंद्रांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित करण्यात आलेली महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ (टीईटी) रविवार, २८ जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील एकूण ४१ परीक्षा केंद्रांवर पार पडणार आहे. ही परीक्षा सकाळी १०.३० ते दुपारी १ आणि दुपारी २.३० ते सायंकाळी ५ अशा दोन सत्रांमध्ये घेतली जाणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी या परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रितरित्या प्रवेश करता येणार नाही, तसेच कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास सक्त मनाई असेल. परीक्षार्थी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करता येणार नाही. त्याचप्रमाणे परीक्षा केंद्राच्या शंभर मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक यांसारखी सर्व माध्यमे व व्यावसायिक आस्थापने आदेशाची मुदत संपेपर्यंत पूर्णपणे बंद राहतील. याशिवाय, परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर कोणतीही इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे घेऊन प्रवेश करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

परीक्षा शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करता येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस किंवा वाहनास प्रवेश मनाई राहील. हे प्रतिबंधात्मक आदेश २८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहतील. मात्र, हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी, केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबत त्यांचे परीक्षासंबंधी कर्तव्य पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत.

# विधानमंडळ पावसाळी अधिवेशनासाठी छापील पास बंद!

## सर्वांना 'चेहरा पडताळणी पध्दती'द्वारेच प्रवेश...

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवार, २२ जून, २०२६ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होणार असून यावेळी विधान भवन प्रवेशासाठी प्रथमच एकही प्रवेश पत्रिका छापण्यात येणार नसून पीठासीन अधिकारी, मुख्यमंत्री ते अधिकारी-कर्मचारी वर्ग, स्वीय सहायक, अभ्यागत अशा सर्वांसाठी विधान भवन ई-प्रवेश प्रणालीद्वारे 'चेहरा पडताळणी पध्दती' अवलंबिण्यात येत आहे, अशी माहिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे देण्यात आली. विधानपरिषदेचे माननीय सभापती प्रा.राम शिंदे आणि विधानसभेचे माननीय अध्यक्ष ॲड. श्री.राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून त्याची अत्यंत काटेकोर स्वरूपात अंमलबजावणी करण्यात येणार आहे.



अधिवेशनकाळात विधान भवन परिसरामध्ये होणारी गर्दी नियंत्रित असावी तसेच सुरक्षा यंत्रणेला तपासणी संदर्भात सुलभता असावी या दृष्टीने या पावसाळी अधिवेशनात छापील प्रवेशपत्राऐवजी 'चेहरा पडताळणी पध्दती' राबविण्यात येत असून याबाबत मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री तसेच अन्य सर्व संबंधित आस्थापना, वार्तांकनासाठी येणारे इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट माध्यमांचे प्रतिनिधी, भा.प्र.से. तसेच भा.पो.से. आणि अन्य सर्व अधिकारी कर्मचारी, सचिव-विशेष कार्य अधिकारी, सर्व स्वीय सहायक अशा सर्वांना यासंदर्भात विधानमंडळ सचिवालयातर्फे सूचित करण्यात आले आहे. ई-ऑफिस प्रणालीद्वारे ऑनलाईन स्वरूपात माहिती पाठविणे, आवश्यक ती माहिती ई-मेलवर प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू झाली असून ती दिनांक २० व २१ जून, २०२६ रोजी सुटीच्या दिवशीही सुरू राहणार आहे. यासंदर्भातील सविस्तर परिपत्रक महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने जारी केले आहे. सर्वांनी या नव्या प्रवेशपास प्रणालीचा स्वीकार करावा आणि सुरक्षा यंत्रणेला सहकार्य करावे असे आवाहनही विधानमंडळ सचिवालयातर्फे करण्यात आले आहे

## मराठी भाषा प्रमाणपत्र नसल्यास १५ ऑगस्टनंतर अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १ जून ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून, १५ ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फतच चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे.

परिवहन विभागाचे सहआयुक्त रवी गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात (एमएमआर) प्रशिक्षण वर्ग मोठ्या प्रमाणावर सुरू असून यासाठी सुमारे ७१ अभ्यास केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या मोहिमेला शैक्षणिक बळ देण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे सुमारे साडेचार हजार शिक्षक प्रशिक्षण कार्यात सहभागी झाले आहेत. तसेच सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे (आरटीओ) अधिकारी चालकांना आवश्यक सहकार्य करत आहेत.

प्रवाशांशी संवाद साधताना भाषेची अडचण दूर करणे, सेवा अधिक दर्जेदार बनविणे आणि चालकांच्या व्यावसायिक संधी वाढविणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे विभागाने कळविले आहे. मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान मिळाल्याने प्रवासी व चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होणार असून दैनंदिन व्यवहार सुलभ होण्यास मदत मिळणार आहे.

परिवहन विभागाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे की, १५ ऑगस्ट २०२६ नंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या अमराठी चालकांवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल. मात्र कोणावरही कारवाई करण्याचा उद्देश नसून, सर्व चालकांनी या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेऊन वेळेत प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन सहआयुक्त रवी गायकवाड यांनी केले आहे.

## भेसळ रोखण्यासाठी मंत्री झिरवाळही मैदानात , भल्या पहाटे नाशिकच्या दूध बाजारात अधिकाऱ्यांसह मारला छापा

**नाशिक :** राज्यातील अन्न भेसळीविरोधातील कारवाया अधिक तीव्र होत असतानाच अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी पहाटे नाशिकच्या दूध बाजारात अचानक भेट देत अधिकाऱ्यांसह छापा टाकला. मंत्र्यांच्या या अनपेक्षित भेटीमुळे बाजार परिसरात काही काळ खळबळ उडाली.जुन्या नाशिकमधील दूध बाजारात सकाळच्या वेळी पोहोचलेल्या मंत्री झिरवाळ यांनी दूध संकलन, वाहतूक आणि वितरण प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी दूध विक्रेत्यांशी संवाद साधत शहरातील दूध पुरवठ्याबाबत माहिती घेतली. तसेच संशयित दूध नमुने तपासणीसाठी घेण्याचे निर्देश देत काही नमुने अधिकाऱ्यांकडून जप्त करण्यात आले.अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाकडून भेसळखोरांविरोधात कठोर पावले उचलली जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून झालेल्या या अचानक तपासणीमुळे दूध व्यवसायातील नियमांचे पालन करणाऱ्यांना दिलासा मिळाला असून भेसळ करणाऱ्यांमध्ये मात्र धास्ती निर्माण झाली आहे. दरम्यान, घेतलेले दूध नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार असून अहवालानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.










हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.